।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## *(Research Section)*

परिपत्रक क्रमांक ८९/२०२५

**विषय:-** पीएच.डी. च्या तात्पुरत्या प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा करण्यासंदर्भात सुचना/कार्यवाही.

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्फत पीएच.डी.प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या पीएच.डी. प्रवेश पुर्व परिक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण आहे किंवा ज्यांना परीक्षेतून सुट देण्यात आली आहे अशा विद्यार्थ्यांचे प्री.पीएच.डी. कार्सवर्कचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्री.पीएच.डी. कोर्सवर्क पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा अंतिम स्वरूप देणेकामी ती, मान्यताप्राप्त संशोधन सल्लागार समितीपुढे सादर करून त्यास मान्यता घ्यावयाची आहे. संशोधन सल्लागार समितीने (RAC) मान्य केलेली रूपरेषा त्यांच्या लॉगीन मधून **दि. ३१/१२/२०२५ पर्यंत** अपलोड करणे आवश्यक आहे. संशोधन व मान्यता समित्यांचे (RRC) आयोजन जानेवारी २०२६ च्या पहिल्या आठवडयात करण्याचे प्रस्तावित आहे, याबाबत सविस्तर विषयनिहाय वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनाचा प्रस्ताव तयार करतांना संशोधनाची रूपरेषा ( Outline of Research ) आपल्या विषयानुसार त्यांच्या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करावी, त्यात खालील मुद्यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

१) संशोधन शिर्षक ( Research Title )
२) संशोधनाची प्रस्तावना (संक्षिप्त) ( Introduction in Short )
३) संशोधनाची पार्श्वभुमी ( research Background )
४) संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन ( Literature Review )
५) गृहितक व उद्दष्टे ( Hypothesis and Objectives )
६) दृष्टीकोन व कार्यपध्दती ( Approach/Methodology )
७) अपेक्षीत परीणाम ( Expected Outcome )
८) संदर्भ सुची ( References )

संशोधनाची रुपरेषा १० पुष्ठांपेक्षा जास्त असू नये व त्यात प्रकरणांची संख्या व नावे नमूद करु नयेत. विद्यार्थ्यांनी संशोधनाचा प्रस्ताव वरील प्रमाणे शिर्षक (Tital of Research) मार्गदर्शक यांचेकडून तपासून घ्यावी व ती मान्यताप्राप्त संशोधन केंद्रातील संशोधन सल्लागार समितीकडून मान्य करून घ्यावी.

संशोधन प्रस्तावाच्या (शिर्षक व रूपरेषा) प्रत्येक पानावर (परीपत्रक क्र.५८/२०२४ मधील मुद्दा क्र. ८(e) अन्वये गठीत) संशोधन सल्लागार समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. संशोधक मार्गदर्शक यांनी संशोधन संल्लागार समितीच्या (Research Advisory Committee) सभेची, विद्यार्थ्यांसह उपस्थिती अहवालाची नोंद ठेवावी. सर्व संशोधक मार्गदर्शक यांनी त्यांच्या विषयातील मान्यताप्राप्त संशोधन केंद्रात संशोधन सल्लागार समितीचे आयोजन (ऑनलाईन/ऑफलाईन) पध्दतीने **दि.३१/१२/२०२५ पर्यंत** होईल असे नियोजन करावे.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

(Research Section)



संशोधक विद्यार्थ्यानी वरील प्रमाणे कार्यवाही झाल्यावर, मान्य झालेल्या संशोधनाच्या रुपरेषेची ( Research Outline ) ज्यावर समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत त्याची PDF File तयार करून (Pdf केलेल्या document ची साईज २ MB पेक्षा जास्त असू नये) ती OAASIS Portal च्या Login मधून Upload करावी. शिर्षक बिनचूक टाईप करावे व रूपरेषा स्वतंत्र Upload करावी व सदर रुपरेषेच्या मुळ प्रतीसह एकूण ०५ प्रती संशोधन व मान्यता समितीच्या (RRC) सभेच्या वेळी समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे. संशोधनाचे शिर्षक इंग्रजी भाषेव्यतिरिक्त असल्यास Unicode Font चाच वापर करावा.

(प्रविण एम. चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.) संशोधन विभाग

सोबत :- वरीलप्रमाणे

जा.क्र.कबचौउमवि/११/पीएच.डी./रुपरेषा/१२७२/२०२५
दिनांक :१५/१२/२०२५

प्रति :
१. सर्व संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक, कबचौउमवि, जळगाव
२. सर्व मान्यताप्राप्त पदव्यूत्तर संशोधन केंद्राचे प्रमुख तथा प्राचार्य, कबचौउमवि, जळगाव